RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MNW/35/2017-2019
Published on : 12 February, 2017 :: Posted at Kandivli(w) Post Office, Mumbai on 14 February, 2017

अजायब बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : चौदा | अंक : आठवा | फेब्रुवारी २०१७

4 मेरा सतगुरु सोहणा (भजन)
29 रक्षक (अनमोल वचन)
7 प्रश्नोत्तरे
31 अमृतवेळ (संदेश)
19 सुख-दु:खांचे नगर (सत्संग)
34 धन्य अजायब

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.

मेरा सतगुरू सोहणा आ गया

मेरा सतगुरू, मेरा सतगुरू सोहणा, आ गया,
मैनूं सिध्धे रस्ते, पा गया, (२)

१. अज भागां भरया, दिन आया, असीं याद गुरू दी, गा रहे,
उस कुल मालिक, निरंकार दा, अज जन्म दिहाड़ा, मना रहे, (२)
मेरा सतगुरू सोहणा...

२. ओह दुनियां दे कोने–कोने ते, सच्चे नाम दा होका, ला गया,
ओह बेटा बण के, सावन दा, मींह अमृत दा, बरसा गया, (२)
मेरा सतगुरू सोहणा...

३. पिता हुक्म सिंह दा, लाडला, ओहदा नाम सन्त, कृपाल है,
माता गुलाब देवी दा, जाया ऐ, पर दुनियां ते एक, मिसाल है, (२)
मेरा सतगुरू सोहणा...

४. लक्खां होण वधाईयां, संगत जी, मेरे गुरू दा भंडारा, आ गया
मैं, 'अजायब' सी, भुल्ल गया, फड़ सीधे रस्ते, पा गया, (२)
मेरा सतगुरू सोहणा...

परम संत कृपाल सिंहजी महाराजांच्या जन्मदिवसा निमित्त (६ फेब्रुवारी २०१७) सर्व संगतला खूप खूप शुभेच्छा.



प्रश्नोत्तरे

परमसंत कृपाल सिंहजी महाराजांद्वारे प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे
मियामी, फ्लोरिडा, अमेरिका – ७ जानेवारी १९६४

एक प्रेमी : *महाराजजी, आम्ही लोकं अतिशय अंत:करणापासून आपणांस समर्पित आहोत. माझी इच्छा आहे की, तुम्ही आम्हांस समजावून सांगावे की, आपापसांमध्ये वेळोवेळी होणारी भांडणे आम्ही कशी टाळावीत? मला असे वाटते की आपण घालून दिलेल्या नियमांचे आम्ही पालन केले तर आमचे एकमेकांशी वाद होणार नाहीत असा समज आमच्यापैकी अनेकजणांचा आहे. या बाबतीत आपण अधिक विस्ताराने समजून सांगावे.*

महाराज कृपाल : मी तुमच्या ग्रुप लिडरसह सर्वांना एकच निर्देश देतो की, तुम्ही सर्वांनी स्वत:चे आत्मपरिक्षण करावे. आत्मपरिक्षणासाठी नित्यनेमाने डायरी लिहावी आणि त्यानुसार जीवन जगल्यास कोणत्याही प्रकारचे भांडण होणार नाही. कुणाबद्दलही वाईट विचार करू नका. तुमच्या कठोर शब्दांनी इतर लोकं दुखावली जाऊ शकतात. हेच खरे एकमेकांच्या तिरस्काराचे मुख्य कारण असते. मी आत्ताच सांगत होतो की, एखाद्या अंध व्यक्तीस आपण,''ए आंधळ्या''अशी हाक मारतो. परंतु त्याला आपण असेही विचारू शकतो, ''प्रिय मित्रा! तू अंध कधी झालास?''या दोन वाक्यांमध्ये किती फरक आहे? एक वाक्य दुखावणारे आहे तर दुसरे वाक्य दुखावणारे नाही.

तुम्हाला तर इतर कुणाच्या वागण्यामध्ये वावगे वाटत असेल तर त्यास एकांतात त्याबद्दल सांगा,''प्रिय मित्रा! तुझे असे वागणे ठिक वाटत नाही.'' परंतु त्यास बातमी बनवून सांगत सुटू नये, यावरून वेगवेगळे समूह बनवू नये. इतरांनी ऐकलेल्या वा पाहिलेल्या गोष्टींवर तुम्ही विश्वास ठेवू नका. परंतु वास्तवात आपण काय करतो? अगोदर आपण असे वागतो की त्यानंतर आपल्याशी संलग्न असलेल्या लोकांची एक पार्टी बनवून त्या लोकांद्वारे

इतरांकडे बातम्या पोहचवतो. एखाद्या संसर्गजन्य आजाराप्रमाणे तो संसर्ग पसरत राहतो आणि तेथे निरनिराळ्या पार्ट्या तयार होऊ लागतात.

इतरांबद्दल वाईट विचार करू नये, वाईट ऐकू नये, वाईट पाहू नये आणि वाईट बोलू नये. इतरांकडून स्वाभाविकपणे एखादी चुकी झाल्यास, त्यास मित्रत्वाच्या भावनेने समजावून सांगावे. मला वाटते वाद–विवादाचे हेच खरे मूळ कारण आहे. आपण नेहमी असे म्हणतो की, माझे सर्वजण ऐकतात माझा हुकूम चालतो, तेव्हा मी तुला येथून हाकलून देईन. कुणाला बाहेर हाकलून देणारे तुम्ही कोण आहात? हा सत्संग गुरूंचा आहे. येथे सर्वजण गुरूंमुळे उपस्थित आहेत. त्यामुळे कुणी जर असे म्हणत असेल, तर तो गुरूंच्या आज्ञेचे पालन करीत नाही. खरेतर ग्रुप लिडर सत्संगींच्या रक्षणासाठी आणि त्यांच्या मदतीसाठी असतात.

तुम्ही एकमेकांवर प्रेम करा. चुका कोणाकडूनही होऊ शकतात, जर तुम्ही एकमेकांवर प्रेम करीत असाल तर प्रेम इतरांना माफ करणे व चुका विसरणे हेच जाणते. तुम्ही त्यानुसार वागलात तर कोणताही वाद–विवाद होणार नाही. आपले शब्द प्रेमाने ओथंबलेले असावेत. प्रेमाने ओथंबलेले शब्द अनमोल असतात. परंतु असे शब्द नम्रतेने रंगलेले असावेत. कित्येकदा आपण आवेशात म्हणतो,''मी हे करू शकतो.'' अशा गोष्टी हृदय दुखावतात.

इतरांनी केलेल्या प्रयत्नांची प्रशंसा करा. त्यांनी लहान–मोठा जो काही प्रयत्न केलेला असेल, त्याची तुम्ही प्रशंसा करा. त्यामुळे त्या माणसास तुम्हांला मदत करण्यास प्रोत्साहन मिळेल. त्याकडून चुका घडू शकतात. त्या चुकांबद्दल त्यास वेगळे एकांतात नेऊन समजावले जाऊ शकते. परंतु त्या बातमीरूपात इतरांना सांगू नयेत. कारण त्यामुळेच वेगवेगळे गट बनतात.

मी तर असेच सांगेन की, ग्रुप लिडरने इतरांशी त्यांच्या आईप्रमाणे वागावे. तो काही गुरू नाही. त्यास तुमच्या मदतीसाठी निवडले गेलेले असते. त्याच्या हातूनही चुका घडू शकतात. परंतु त्याच्यापासून दूर जाणे,

हा काही त्यावर उपाय नाही. त्यांनी एकांतामध्ये भेटावे अशी विनंती तुम्ही करू शकता आणि मला हे पटत नाही असे सांगू शकता. मला आशा आहे की ग्रुप लिडर त्यांचे म्हणणे ऐकतील.

जे होऊन गेले, ते पुन्हा बरोबर केले जाऊ शकत नाही. ती आपली चूक आहे. याचा आपल्या गुरूंच्या शिकवणुकीशी काही संबंध नसतो. गुरूंनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे न वागण्याचा तो परिणाम आहे. तुम्ही गुरूंवर तसेच त्यांच्याकडे जाणाऱ्या प्रेमींवर प्रेम करा. प्रेम केवळ सेवा करणे आणि बलिदान देणेच जाणते. जे काही होते, त्यास प्रेम सुंदर बनविते. माफ करणे आणि विसरून जाणे हेच प्रेम जाणते.

जर काही चुकीचे घडत आहे असे वाटत असल्यास तुम्ही त्या मनुष्याकडे एकटे जा आणि तसे स्पष्ट करा. परंतु त्याचा गाजावाजा करू नका, कारण त्यामुळेच आपापसामध्ये फूट पडते, गट विभाजन होते, जे अतिशय चुकीचे आहे. ग्रुप लिडर तुमच्या मदतीसाठी असून त्यांच्यावर खूप मोठी जबाबदारी असते. ते नियोजन करतात, तुम्हांला मदत करतात, त्यांचा वेळ देतात, कधी–कधी स्वत:चे पैसेदेखील खर्च करतात, ज्याच्या बदल्यात त्यांना काहीही नको असते. ते स्पष्टपणे तुम्हांस सांगतात की, आपले सतगुरूच गुरू आहेत व ते स्वत: काही सतगुरू नाहीत.

ज्यांचे आंतरिक नेत्र उघडलेले असतात, त्यांना सतगुरूंमध्येच परमात्मा दिसतो. ग्रुप लिडर मंडळीदेखील याचप्रमाणे विचार करू लागल्यास मी त्यांचा आदर करीन. तुम्ही परमात्मा प्राप्तीच्या अतिउच्च ध्येयासाठी तुमचा वेळ आणि मेहनत समर्पित करीत आहात. जर दोघांमध्येही ईर्षा असेल, तर तो हे ठिकाण सोडून निघून जातो. हा काही विज्ञानाचा दोष नाही. असे घडण्याचे कारण म्हणजे अजूनपर्यंत आपण परिपूर्ण झालेलो नाही. आपण त्या मार्गावर आहोत. कुणी जास्त प्रगती केलेली असते तर कुणी कमी, परंतु आपणा सर्वांना त्याचा परतावा हवा असतो.

तुम्ही तुमच्या ग्रुप मिटिंगसाठी जाण्यास विसरू नका. तुम्ही जर या मिटिंगसाठी जाणे सोडून दिसल्यास, तुम्ही त्या लोकांपासून दुरावाल. तेथे या शिकवणीची पुन्हा उजळणी करविली जाते. तुम्ही चर्चमध्ये जा, त्यास माझी काही हरकत नाही. माझे तुम्हांस आणखीन एक सांगणे आहे की, तुम्हांला इतर कोणत्या ठिकाणी सत्य सापडल्यास मला सांगा, मी देखील तुमचे अनुकरण करीन.

एक प्रेमी : *महाराजजी, काल रात्री माझ्या बाबतीत आश्चर्यजनक घटना घडली. मी रात्री निद्रावस्थेत असताना मला जाग आली आणि मला तुमचा आवाज ऐकू आला. तुम्ही माझे नाव घेऊन मोठ्याने मला हाक मारली?*

महाराज कृपाल : हो! हे ठिक आहे.

तोच प्रेमी : *महाराजजी! हे चांगले आहे की वाईट? मी आयुष्यभर केवळ दरवाजा ठोठावण्याचा आवाज ऐकला आहे. परंतु तुमचा आवाज अतिशय स्पष्ट होता. मला हाक मारणारा तुमचा आवाज जसा काही खोलीत सर्वत्र घुमत होता.*

महाराज कृपाल : मी तुम्हांस आता समजावून सांगतो. जसे मी पूर्वी अनेकदा सांगितले आहे की, सतगुरु मनुष्यपुत्र नसतात. मनुष्यपुत्र हे एक शरीर असते, ज्यामध्ये परमात्मा सतगुरु स्वरूपात कार्यरत असतो. त्याच परमात्म्याची शक्ती सर्वत्र प्रसार पावलेली आहे, ज्यांना नामदान प्राप्त झाले आहे, त्यांना ती जागृत करते तसेच ज्यांचा काही विशेष पूर्वइतिहास असतो, ती शक्ती त्यांच्या दृष्टीसही पडते.

मनुष्यास जेव्हा नाम मिळते तेव्हा सतगुरु रूप परमात्म्याची शक्ती त्या मनुष्याच्या अंतरात वास करते. हीच शक्ती त्यास आंतरिक उच्च पातळीवर येण्यासाठी प्रोत्साहीत करीत असते. जर आपण त्यादिशेने मुख केल्यास, ते आपले मार्गदर्शन करतात, आपल्याशी बोलतात. ते असे एकदा, दोनदा, चारदा करतात. परंतु तुम्ही त्यांच्याकडे दुर्लक्ष केल्यास, तुम्ही ती संधी वाया

घालविता. परंतु तरीही ते त्याच जागेवर असतात. जेव्हा कधी तुम्ही त्यांच्या दिशेने वळता, ते तेथेच असतात.

तोच प्रेमी : *महाराजजी! तुमचा आवाज अतिशय सुस्पष्ट होता. त्यानंतर मी रात्रभर झोपू शकलो नाही. माझ्या खोलीमध्ये मला अनेक हसवणाऱ्या आणि निरनिराळ्या वस्तू सापडल्या.*

महाराज कृपाल : अशावेळी तुम्ही ध्यान–अभ्यासात बसणे सगळ्यात चांगले असते. कधी–कधी असे होते की ज्यांनी सतगुरुंचे बाह्य स्वरूप पाहिलेले नसते, त्यांच्याबद्दल ऐकलेले नसते अशा लोकांना सतगुरु बाह्य स्वरूपात भेटण्यापूर्वीच त्यांच्या अंतर्यात गुरूस्वरूप प्रगट होते. ते आश्चर्यचकित होतात की हे काय आहे? ते जेव्हा मला भेटतात, तेव्हा म्हणतात की,''अरे! मी तुम्हांला तीन वर्षांपूर्वीच पाहिले होते.'' ही सर्व परमात्म्याची शक्ती आहे जी आपणांस दिसते; त्या शक्तीनेच आपणांस बनविलेले आहे.

एक प्रेमी : *महाराजजी! आजकाल प्राण्यांवर निरनिराळे प्रयोग केले जातात, ज्यामुळे त्यांना कॅन्सर तसेच इतर आजार होतात. असे करण्याचा आपणा मनुष्यांना काही अधिकार आहे का?*

महाराज कृपाल : मनुष्याच्या जीवनाचे रक्षण करण्यासाठी असे केले जाते. जनावरांवर प्रयोग करणे, डॉक्टरांना शिकविले नसते तर तुमचा बचाव कसा झाला असता? मोठ्या गोष्टींच्या प्राप्तीसाठी आपणांस असे करावे लागले. परंतु या पापापासून तुम्ही तुमची सुटका करवून घेऊ शकत नाही. *(एक प्रेमी येऊन सूचना देतो की वेळेचा अभाव आहे, जेवण तयार आहे तसेच लोकांना भूक लागली आहे.)*

महाराज कृपाल : भुकेपूर्वी मी यांना एक खात्रीलायक गोष्ट सांगणार आहे. शक्यता आहे की यानंतर मी देहस्वरूपामध्ये भेटेन की नाही. वियोगापूर्वी मी तुमच्याकडून अपेक्षा करतो की परमात्म्याच्या कृपेने तुम्हांस जी पारमार्थिक पुंजी मिळालेली आहे त्यात तुम्ही दररोज वाढ कराल. तसे केलेत तर मला,

माझ्या अंतर्यातील परमात्म्यास तसेच वर बसलेल्या परमात्म्यास अतिशय आनंद होईल. नामस्मरण सोडू नका. सर्व कामे सोडून सर्वप्रथम दररोज परमात्म्याची भक्ती करा. भक्त बना, स्वत:स परमात्म्यासमोर समर्पित करा.

परमात्मा प्रेम आहे. परमात्म्याकडे परतण्याचा मार्गदेखील प्रेमाचा आहे. परमात्म्याप्रती आपल्या अंतरात प्रेम निर्माण करण्यासाठी, जे काही करावे लागेल, ते तुम्ही करा. प्रेम केवळ सेवा आणि त्याग जाणते. सर्वांस प्रेम सुंदर बनवते. प्रेमास केवळ देणे माहिती आहे, घेणे नाही. मी हे शब्द सर्वांसाठी उच्चारत आहे, मग ते नामधारी असो वा ग्रुप लिडर असो वा प्रतिनिधी असो. ते केवळ देण्यासाठी आहेत, घेण्यासाठी नाही.

इतरांची सेवा करण्यासाठी तुम्ही देहरूपाने जे काही करू शकता, ते सर्व करा. जमत असेल तेवढी धनाची सेवा करा. सर्वप्रथम इमानदारीने स्वावलंबी बनून स्वत:च्या कुटुंबाचा चरितार्थ चालवा आणि जे उपाशी तसेच गरजवंत आहेत, त्यांना मदत करा, दान द्या. हे सर्व तुम्ही परमात्म्यासाठी करा. यावर कसलीही किंमत वा कर नाही.

सर्वांप्रती जर तुमच्या अंतरात प्रेम असेल, तर तुम्हा बांधवांमध्ये आपापसांत प्रेम नसेल? तुम्ही तर अशा नात्यांच्या धाग्यांमध्ये ओवले गेले आहात, जे नाते मृत्यूनंतरही नष्ट होणार नाही. तुम्ही सर्व एकाच मार्गाचे प्रवासी असून, परमात्म्याच्या थेट संपर्कात आहात. जेव्हा तुम्ही प्रेमाच्या ओघात असाल तेव्हा तुम्ही कुणाप्रती घृणा वा कुणाचे वाईट चिंतु शकणार नाही. तुम्ही सतगुरूंसाठी सत्संगामध्ये येता.

यानंतर क्रम येतो पापरहित होण्याचा. वेदांमध्ये वैवाहिक जीवनाप्रती जे काही मापदंड सांगितले आहेत, त्यांच्या मर्यादेत राहण्याचा प्रयत्न करा. तुमचा एकाशी विवाह झालेला असताना त्याव्यक्तीशीच विवाहित रहा, सर्वांशी नव्हे. असे शब्द वापरल्याबद्दल मी तुमची माफी मागतो. कारण मी जवळ जवळ सर्वत्रच पाहिले आहे की, स्त्री आणि सोने–चांदी या दोन्ही

गोष्टी आपल्या पारमार्थिक मार्गातील सर्वांत जास्त अटकाव करणाऱ्या आहेत. वेदशास्त्र सांगतात की, स्वअर्जित धनाने आपला उदरनिर्वाह करा, परावलंबी बनू नका. गरजवंतांना मदत करा व जीवनाचे पावित्र्य राखा.

तुम्ही जर प्रेमामध्ये असाल तर तुमच्या वाणीमध्ये दयाभाव असेल, क्रूरता नाही. तुमच्या हातून जर काही चुकीचे झाले असेल तर रात्री झोपण्यापूर्वी ती चूक सुधारा, भांडण समाप्त करा. जोपर्यंत त्या चुकीची सुधारणा होत नाही तोपर्यंत झोपू नये. बायबलमध्ये सांगितले आहे,''जोपर्यंत तुम्ही तुमच्या बांधवांवर प्रेम करू शकत नाही ज्यांना तुम्ही पाहू शकता, तोपर्यंत तुम्ही परमात्म्यावर कसे बरे प्रेम करू शकता ज्यास तुम्ही पाहिलेले नाही?''

ईसा मसीह यांनी सांगितले आहे, ''मी तुम्हाला एक नवीन आदेश देत आहे की तुम्ही एकमेकांवर प्रेम करा.'' परमात्म्याच्या या आदेशाचे पालन करण्याचा तुम्ही प्रयत्न करा. हे कुणा मनुष्याचे काम नसून, ते परमात्म्याचे कार्य आहे. सर्व धर्मांचा हा मूळ सिद्धांत आहे की, परमात्म्यासाठी गरजवंतांना, उपाशी आणि वस्त्रहीन लोकांना तुम्ही मदत करा. हे सर्व तुम्ही, तुमचे जीवन साधे केल्यानेच करू शकता. तुम्ही स्वत:च तर स्वावलंबी नसाल, तर इतरांना मदत कशी कराल?

मी माझ्या एका प्रचारामध्ये म्हटले आहे,''सरळ बना, सरळ बना आणि सरळ बना.'' मला तुमच्याकडून हीच अपेक्षा आहे की जोपर्यंत तुम्ही या देहामध्ये आहात, तोपर्यंत तुम्ही देणारेच बना, घेणारे नाही. जो मनुष्य पवित्र आहे, लालची नाही, ज्याच्या अंत:करणामध्ये सर्वांप्रती प्रेम आणि मुखामध्ये नम्रतेने ओथंबलेली वाणी आहे, अशा मनुष्यास सर्वांकडून सन्मान मिळतो. याचे पालन तुम्ही करा, कारण मनुष्य जीवन परमात्म्यास जाणून घेण्यासाठीच आपणांस मिळालेले आहे.

न मागताच तुम्हांला मदत मिळेल. बाळ निद्रावस्थेत असतानाही आई त्याची काळजी घेत असते. तेथे सर्प आल्यास आई स्वत:चे बलिदान देईल

पण सर्पास बाळाजवळ जाऊ देणार नाही. नामाभ्यास करीत असताना परमात्म्याची शक्ती वा ईसा मसिहची शक्ती तुमच्या सोबत असेल, ती तुमचे रक्षण करील.

एखाद्या मुलाचा त्याच्या आईवर पूर्ण विश्वास असतो. वाघ जरी आला, तरी मुल पळत आईच्या मागे जाऊन लपते. मग भलेही त्या वाघाने आईस ठार करून जरी खाल्ले, तरी त्या मुलाचा आईवर विश्वास असतो. तुमचा जर पूर्ण विश्वास असेल तर तुम्ही पर्वतदेखील हालवू शकता. विश्वासच सर्व धर्मांचे मूळ कारण आहे.

व्यवहार स्वरूपात जर तुम्ही पाहिले, तर तुम्हांस असे काही पारमार्थिक धन मिळालेले आहे ज्याचे वर्णन वेद-शास्त्रांमध्येही आहे, ज्यात तुम्ही दररोज वाढ करावयास हवी. मी तुम्हा सर्वांना सत्याचे प्रतिनिधी बनण्यासाठी शुभेच्छा देतो. पीक कापण्यासाठी खूप आहे, परंतु त्यासाठी मजुरांची गरज आहे. परंतु ते मजूर आदर्श मजूर असावयास हवेत. तुम्ही आदर्श बनण्याचा प्रयत्न करा. प्रत्येकाने आदर्श बनावयास हवे. तुम्ही व्यवहारी बना. तुम्ही स्वत: जर पवित्र बनण्याचा प्रयत्न केला, तर सर्व जगच पवित्र बनेल. आपण इतरांना पवित्र बनण्यास सांगतो, पण स्वत: मात्र पवित्र बनत नाही. सर्व अडचणींचे हेच एक कारण आहे. तुम्हां सर्वांसोबत माझ्या शुभेच्छा आहेत. माझ्यावर गुरु-परमात्म्याची कृपा आहे. तुम्हां सर्वांना मार्गावर आणले आहे. त्यावर तुम्ही पुढे वाटचाल करा हीच माझी इच्छा आहे.

मिस्टर खन्ना : *येथे मी माझ्या महान सतगुरुंचे आभार मानू इच्छितो. (मिस्टर खन्ना यांनी अगोदर त्यांचे गुरू बाबा सावन सिंहजींची सेवा केली आणि नंतर महाराज कृपाल सिंहजींच्या प्रतिनिधींपैकी एक प्रतिनिधी बनले.)*

महाराज कृपाल : प्रेम प्रदर्शित करण्याची काही गरज नाही. हे माझे आणि माझ्या अंतर्यातील परमात्म्याचे कर्तव्य आहे. मी सांगितल्याप्रमाणे जर तुम्ही तुमचे जीवन बनविले, तर मी तुमचा आभारी व कृतज्ञ होईन.

मि. खन्ना : *मी येथे सर्व प्रेमींचा आभारी आहे, ते सर्व अतिशय प्रिय आहेत. मला वाटते की, हा ग्रुप पुढे खूप उन्नती करेल. परंतु मी महाराजजींच्या एका गोष्टीशी सहमत नाही ती म्हणजे त्यांनी म्हटले की हे त्यांचे येथे येणे अखेरचे असू शकते.*

महाराज कृपाल : मी तुम्हांस खरी गोष्ट सांगितली आहे. हे सर्व परमात्म्याच्या हातामध्ये आहे.

मि. खन्ना : *होय सर!*

महाराज कृपाल : हो! कधी कधी उत्साहाच्या भरात आपण खूप काही बोलून जातो. हे परमात्म्याच्या हातात असून, ते काही वचन नाही.

मि. खन्ना : *महाराजजी! तुम्ही आम्हांवर कृपा कराल, पुन्हा येथे याल. अमेरिकेमध्ये आम्हांला भारतापेक्षा खूप जास्त गुरूंची गरज आहे.*

महाराज कृपाल : मी केवळ परमात्म्याच्या आदेशानुसारच येथे आलेलो आहे. परमात्म्याची इच्छा असल्यास मी शंभर वेळा येईल. हे त्याचे काम आहे, जे तो स्वत:च करीत असतो. तुमच्या अपेक्षा प्रशंसनीय आहेत. मी त्यांची प्रशंसा करतो. परंतु हे सर्व परमात्म्याच्या हातात आहे. कुणास कल्पना की उद्या दिवसा वा रात्री काय घडेल?

मि. खन्ना : *महाराजजी, अजून आपण तरुण आहात आणि आम्हांस दर्शन देण्यासाठी तुम्ही खूपदा येऊ शकता.*

महाराज कृपाल : आत्मा नेहमीच तरुण राहतो. प्रश्न आहे तो परमात्मा आणि त्याच्या कृपेचा. परमात्म्याची इच्छा असल्यास मी येईन. तुमची अशीच इच्छा असल्यास परमात्मा ती मान्य करू शकतो.

मि. खन्ना : *आम्हांस लवकरच दर्शन देण्यासाठी तुम्ही नक्कीच याल. आम्ही सर्वजण एक बनून पैशांनी, शरीराने आणि सर्वप्रकारे तुमच्या कार्यामागे मदत करू ज्यायोगे संपूर्ण विश्वामध्ये अपार शांती येईल.*

महाराज कृपाल : माझ्या सांगण्यानुसार तुम्ही जीवन जगल्यास मला अत्यंत आनंद होईल. गरीब–श्रीमंत, उच्च–नीच, ग्रुप लिडर–नामधारी आणि आपण सर्वजण एकसमान आहोत. परमार्थामध्ये आपण सर्वजण बंधु–भगिनी आहोत. परमात्म्याची कृपा आहे की, कोणत्याही मोबदल्याशिवाय तो तुम्हांला मदत करीत आहे.

ग्रुप लिडर : *मी तुम्हांला काही सांगू इच्छितो?*

महाराज कृपाल : होय बोल! एखाद्या वेड्या मनुष्याप्रमाणे तुम्हाला आता काय बोलायचे आहे?

ग्रुप लिडर : *महाराजजी, मला वेडा म्हटल्याबद्दल तुमचे आभार. मी वेड्यांप्रमाणेच तुमच्यावर प्रेम करतो. मी स्वत:स नेहमीच वेडा म्हणवितो. आमच्या आत्म्यांना भरपूर प्रकाशाने तेजोमय करण्याबद्दल मी तुमचे आभार मानू इच्छितो. आम्ही निरंतर तुमच्या कृपेने आणि तुमच्या शक्तीने पाहू इच्छितो की आमच्या द्वारे तुमचे कार्य प्रकाशित होत राहो. कारण तुम्ही म्हटले आहे की सर्व विश्वाची रचना परमात्म्याचे कार्य प्रकाशित करण्यासाठी आहे.*

महाराज कृपाल : परमात्मा सर्वांची प्रशंसा करेल. परमात्म्याची इच्छा आहे की, त्याचे नाम सर्वत्र उज्ज्वल व्हावे.

ही परमात्म्याची कृपा आहे की, जो ज्यागोष्टीसाठी योग्य आहे, त्यास परमात्मा तेच देतो. सर्वांना देण्यासाठी परमात्म्याकडे आहे, परंतु परमात्मा त्याची वाट पाहत आहे जो त्याच्या दिशेने आपले मुख करतो. वडिल त्यांच्या सर्व मुलांनी स्वावलंबी बनावे अशी मनोकामना करतात.

मि. खन्ना : *आम्ही तुमचा वाढदिवस २५ जानेवारी १९६४ रोजी वॉशिंग्टन येथे साजरा करीत आहोत.*

महाराज कृपाल : जानेवारी २५ ही तारीख ठीक आहे. परंतु जर ती तारीख बदलावयाची असल्यास अगोदरची तारीखच असावी. जे काही ठरेल ते मला नंतर कळवा.

वाढदिवसाच्या प्रश्नावरून मला वाटते की नामधारी दररोज सकाळी, प्रत्येक श्वासानुरूप, ज्याच्या अंतर्यात परमात्मा प्रगट आहे अशा लोकांना भेटून आनंद साजरा करावयास हवा. त्या पाठाची पुनरावृत्ती करण्यासाठी तुम्ही एकत्र व्हाल, हे ऐतिहासिक आहे. ज्यांच्या मार्गदर्शनानुसार तुम्ही जगाल, तेव्हाच त्यांचा वाढदिवस खऱ्या अर्थाने साजरा होईल.

अनेकदा तो धार्मिक रिती–रिवाज बनून जातो. मला वाटते की, वाढदिवसाचा सर्वात मोठा उत्सव माझ्या सतगुरुंच्या कृपेनेच होत आहे. वाढदिवसाच्या रूपात सर्व काही येते, परंतु तो तुम्ही दररोज साजरा करावा.

मि. खन्ना : इतिहासामध्ये असे प्रथमच घडेल की एखाद्या जीवित सतगुरुंचा वाढदिवस अमेरिकेमध्ये साजरा होईल. जे कुणी येऊ इच्छित असतील, त्या सर्वांचे स्वागत आहे.

(महाराज कृपालजींचा ऐहिक वाढदिवस ६ फेब्रुवारी आहे. भारतात परतण्यापूर्वी महाराजजींचा वाढदिवस अमेरिकेत साजरा करता यावा म्हणून २५ जानेवारी रोजी साजरा केला गेला.)

***



सुख-दु:खांचे नगर

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, स्वामीजी महाराजांची वाणी
रिबोला, इटली - २२ मे, १९८९

तुमच्या समोर स्वामीजी महाराजांची वाणी सादर केली जात आहे. ती वाणी तुम्ही मन एकाग्र करून लक्षपूर्वक ऐका. संत महात्म्यांची वाणी अतिशय मौल्यवान असते. सर्व महात्मे आपणांस हेच सांगतात की परमात्म्याने आपणांस हा मनुष्यजन्म त्याच्या भक्तीसाठी, नामाची प्राप्ती करवून घेण्यासाठी दिलेला आहे. परंतु अतिशय कमी लोकं नाम प्राप्त करून घेतात, सतगुरू भक्तीत रममाण होतात. परंतु आपण जर ही संधी वाया घालवली, तर आपणांस पुन्हा या सुख-दु:खांच्या नगरामध्ये यावे लागते.

आत्म्यास आईच्या गर्भामध्ये नऊ महिने उलटे लटकून राहवे लागते. ती जागा अतिशय लहान व घाणरेडी असते, जेथे जीव पश्चात्ताप करतो, परमेश्वराची प्रार्थना करतो की, हे परमेश्वरा! तू येथून बाहेर पडण्याची मला एक संधी दे. या संधीचा लाभ घेऊन मी तुझी भक्ती करीन, तुझे ध्यान करीन आणि तुझ्या नामाची शिदोरी जमा करीन. परंतु जन्मास आल्यानंतर तो हे सर्व विसरून जातो. परमेश्वराने दिलेली संधी तो वाया घालवितो.

गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगतात, ''आईच्या उदरामध्ये शब्द याचे संरक्षण करतो. तेथे हा उलटा लटकलेल्या स्थितीत असतो, तरीही याचे लक्ष तिसऱ्या तिळावर एकाग्र असते, तो परमात्म्याच्या शब्दाच्या आवाजामध्ये लीन झालेला असतो.''

मात गर्भ दुख सागरों भारे तें अपना नाम जपाया।

महात्मा सांगत आहेत की तुम्ही कधी शांत अंत:करणाने विचार केला आहे का की आईच्या उदरामध्ये असताना आपण निराश्रित असतो. आईने जर एखादे चुकीचे काम केले तर त्याचा परिणाम बाळावर पडतो. आईने

अनुचित अन्न ग्रहण केल्यास, त्याचा बाळावर वाईट परिणाम होतो. हे दु:ख नाही का? स्वत:च्या वेदनांबद्दल ते बाळ कुणाला सांगू शकेल? त्यास तेथे केवळ परमात्म्याचाच आसरा असतो. गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगतात:

मुख तले पैर उपरे वसंदे कुहथड़े थाओं।
नानक सो धनी क्यों विसारया उदरे जिसदा नाओं।।

ज्या घरात बाळाचा जन्म होतो, त्या घरात आनंदाचे वातावरण निर्माण होते. खाटेवर पडून बाळ घरातील नव–नवीन दृश्ये पाहत असते, ते आनंदमय वातावरण पाहून बाळही आनंदी होते. आई–वडीलांना आनंद साजरा करताना पाहून, बाळ त्यांच्या प्रेमामध्ये आणि मोहामध्ये फसून परमेश्वराने भक्ती करण्यासाठी दिलेली संधी वाया घालविते.

त्याचे बालपण खेळण्यामध्ये व खाण्या–पिण्यामध्ये व्यर्थ जाते, तारुण्य विषय–विकरांमध्ये वाया जाते. वृद्धापकाळामध्ये तो आजाराने तसेच चिंतांनी ग्रस्त होतो. अखेरीस एखाद्या आजाराने त्याचे शरीर जर्जर बनते. वृद्धावस्थेत आजारग्रस्त होऊन शरीर निकामी बनले असता एके दिवशी मृत्यु येऊन त्याचा गळा दाबतो. ज्या बंधु–भगिनींवर, नातेवाईकांवर आपण आयुष्यभर प्रेम केलेले असते, ते देखील मृत्युसमयी आपणांस मदत करू शकत नाहीत. ते त्यावेळी रडत जरी असतील तरी त्यांचे ते रडणे स्वार्थासाठी वा मोहापोटी असते. जाणाऱ्यास ते थांबवू शकत नाहीत, सांभाळून ठेवू शकत नाहीत. लवकरच त्याच्या पार्थिव शरीरास अग्नी देतात वा मातीमध्ये गाडून टाकतात.

संत–महात्मा आपणांस मुला–बाळांचा व घराचा त्याग करण्यास सांगत नाहीत तसेच धर्म परिवर्तनही करण्यास सांगत नाहीत. ते सांगतात की तुम्ही कुटुंबात राहून तुम्हाला ज्या काही कौटुंबिक जबाबदाऱ्या मिळालेल्या आहेत, त्या पूर्ण करा. ज्या परमात्म्याने आपणांस जन्म दिला आहे, आपली विनंती ऐकली आहे, त्याचीदेखील भक्ती करा, मनुष्यजन्माचा फायदा करून घेत, त्याची भेट करून घ्या.

संत–महात्म्यांनी मेहनत केली, ध्यान–अभ्यासाची कमाई करून ते अंतर्यात गेले आणि स्वत:च्या जीवनकाळामध्येच परमात्म्यास भेटले. त्यांनी जे सत्य पाहिले त्याचे वर्णन धर्मग्रंथांमध्ये केले. ते सत्य म्हणजे हे जग काही आपोआप कार्यशील नाही. त्याची कोणीतरी रचना केलेली आहे, त्यामागे परमात्म्याचा हात गुप्त रूपाने कार्यरत आहे. या जगातील परमात्म्याने बनविलेल्या सर्व वस्तू परिवर्तनशील आहेत. या जगातील सर्व वस्तू बदलतात, परंतु प्रभु–परमात्मा मात्र युगा–युगांतरापासून तोच आहे, त्यामध्ये मात्र काहीच बदल झालेला नाही. तोच एक सत्य आहे. येथे सत्य म्हणजे जे कधीच बदलत नाही, जे सदैव कायम राहते. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

आदि सच जुगादि सच है भी सच नानक होसी भी सच।

परमात्मा पूर्वीही होता, तो आजही आहे आणि तोच परमात्मा पुढे भविष्यात राहणार आहे. महात्मा आपणांस हे सत्य देखील सांगतात की प्रियजनहो, हे जग आपले खरे घर नाही. हे तर सुख–दु:खांचे नगर आहे, अडी–अडचणींचा देश आहे. माहित नाही येथे सुखांचे रूपांतर दु:खांमध्ये कधी होईल? मृत्यु देवता कधी येऊन आपला कान पकडून येथून घेऊन जाईल, याचेही आपणांस ज्ञान नाही. त्यामुळे महात्मा आपणांस समजावून सांगतात की या मनुष्यजन्मामध्ये शब्द–नामाची कमाई करूनच तुम्ही मनुष्य जन्माचा खरा पुरेपुर फायदा करून घेऊ शकता. कारण तसे वरदान केवळ मनुष्य–जन्मासच प्राप्त आहे.

महात्मा आपणांस प्रेमाने समजावतात की ज्या शरीराचे आपण आयुष्यभर पालन–पोषण करतो, त्यामध्ये बसून इतरांना मनुष्यही मानत नाही, अहंकार करतो. ते शरीर तुमचे स्वत:चे नसून ते भाड्याचे घर आहे. एके दिवशी ते आपल्याकडून हिरावून घेतले जाणार आहे. मांजरीला पाहून कबूतर डोळे मिटून घेते, त्यास वाटते की मांजरीपासून आपली सुटका झाली. परंतु काही क्षणातच त्याच्या लक्षात येते की ते मांजरीच्या जबड्यात सापडलेले आहे.

याचप्रमाणे आपणांस स्वत:च्या मृत्यूचा विसर पडतो. आपणांस वाटते की मृत्यु कदाचित इतरांचाच होणार आहे, आपला नाही. खरेतर आपण आपल्या प्रिय मित्रांना, प्रियजनांना स्वत: स्मशानामध्ये नेतो, त्यांच्या तिरडीस खांदाही देतो. परंतु स्वत:च्या मृत्युस मात्र विसरतो. आपण म्हणतो, मृत्यू तर इतरांसाठीच आहे. आपल्यासाठी येथील ऐषो-आराम, मद्य-मांसाच्या सेवनाची मौज आहे. तुम्ही लक्षपूर्वक ऐका, या विषयावर स्वामीजी महाराज आपल्या वाणीतून सविस्तर समजावून सांगत आहेत:

अटक तू क्यों रहा जग में। भटक में क्या मिले भाई।।

आपण प्रेमाने सांगत आहात, ''या जगामध्ये येऊन तू विषय-विकारांमध्ये गुंतून का पडला आहेस? तू सांसारिक भोगांना मित्र का बनविले आहेस? जेव्हापासून आपला आत्मा परमात्म्यापासून दुरावला आहे, तो येथे भरकटत फिरत आहे, त्यास ना रात्री ना दिवसा आराम आहे.'' सहजोबाई सांगतात:

धनवंते अति ही दुखी निर्धन दुख का रूप।
साध सुखी सहजो कहे जिन पाया भेद अनूप।।
न सुख विद्या के पढ़े न सुख वाद विवाद।
साध सुखी सहजो कहे जिन लग्गे सुन्न समाध।।

तुलसीसाहेब सांगत आहेत:

कोई तो तन मन दुखी कोई नित उदास।
एक एक दुख सबन को सुखी सन्त का दास।।

महात्मा आपणांस सांगतात की या कर्म-भूमी जगात येऊन प्रत्येकजण आप-आपल्या कर्मांमध्ये फसलेला आहे, दु:ख व वेदनांच्या त्रासात तळमळत आणि कण्हत आहे. तरीही आपले परमार्थ मार्गावरून भरकटलेले मन परमात्म्याच्या भक्तीकडे वळत नाही. कबीरसाहेब सांगतात:

देहधरी का दंड सब काहू को होय।
ज्ञानी भोगे ज्ञान से अज्ञानी भोगे रोय।।

आपण सांगत आहात, ''हे काळाचे नगर सुख–दु:खांचे नगर आहे. आपण या नगरापार जाण्याचा प्रयत्न करा. येथे उभे राहून कुणीही ठामपणे सांगू शकत नाही की हे विश्व कधी बनले? आपण या जगात यापूर्वी किती वेळा आलो आणि आपण किती योन्यांमध्ये जन्म घेतला? किती स्त्रियांशी विवाह करून त्यांना सोडून दिले? वा किती पुरुषांशी विवाह करून त्यांना त्यागले? येथे किती वेळा येऊन बिऱ्हाड स्थापित केले? यापूर्वी किती जणांना आई–वडील बनविले वा किती जणांचे आई–वडील आपण बनलो?

खटक तू धार अब मन में। खोज सतसंग में जाई।।

आपण सांगत आहात, ''आपण आपल्या अंत:करणामध्ये परमात्म्यास स्थान द्यावे, परमात्म्याप्रती विरह निर्माण करावा. यासाठी आपणांस सत्संगात जाण्याची गरज आहे. कारण सत्संगात गेल्यानेच आपणांस आपल्या दोषांचा उलघडा होतो तसेच आपण योग्य दिशेने जात आहोत की अयोग्य दिशेने यांची आपणांस जाणीव होते.''

सत्संगामध्ये महात्मा नामाचा महिमा वर्णन करतात, नाम मिळण्याचे तसेच मनुष्य–जन्माचे फायदे सांगतात. आपण योग्य मार्गावरून भटकून जर हा मनुष्यजन्म वाया घालविला तर त्यामुळे होणाऱ्या नुकसानीबद्दल देखील ते समजावून सांगतात. सत्संगामध्ये बसून महात्मा ना कुणाची स्वत: निंदा करतात, ना आपणांसही इतरांची निंदा करण्यासाठी प्रोत्साहित करतात. महात्मा तर आपणांस सांगतात की आपण जेव्हा इतरांची निंदा करतो, आपण स्वत:चेच अधिक नुकसान करून घेतो. महात्मा सर्वांना एकत्र बसवितात आणि सर्वांना नामाशी जोडतात. ते सर्वांना परमात्म्याशी जोडण्यासाठीच या जगात येतात, एकमेकांपासून दूर करण्यासाठी येत नाहीत. गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगतात:

होय एकत्र मिलो मेरे भाई दुविधा दूर करो लिव लाई।
हर नामे की होवो जोड़ी गुरूमुख बैठो सफा बिछाई।।

विरह की आग जब भड़के। दूर कर जगत की काई।।

स्वामीजी महाराज सांगतात, ''आपण जेव्हा बाह्य-जगामध्ये कुणाची आरती करतो, तेव्हा थाळीमध्ये दिवे ठेवतो, त्यांमध्ये तेल टाकतो. एक प्रकारे आपण रिती-रिवाज पूर्ण करीत असतो. परंतु अंत:करणापासून केलेल्या प्रार्थनेच्या विरहाच्या थाळीमध्ये शब्दाची ज्योत पेटविणे ही खरी आरती होय. जेव्हा एखाद्या प्रेमीची अंतर्यात सतगुरूंशी भेट होत नाही, तेव्हा त्यांच्या अंत:करणामध्ये विरह निर्माण होतो. जेव्हा आपल्या अंत:करणामध्ये विरह निर्माण होतो, तेव्हा ज्याप्रमाणे दिव्याच्या ज्योतीवर झेप घेऊन पतंग (किडा) जळून जातो, त्याप्रमाणे आपल्या अंतरामधून सांसारिक लोक-लज्जा, विषय-विकार पंख फुटून उडून जातात.''

लगा लो लगन सतगुरू से। मिले फिर शब्द लौ लाई।।

बुल्लेशाह खूप मोठे ज्ञानी होते. ते लाहोर येथील एका मशिदीचे मुल्ला होते. त्याचे वडीलदेखील मुल्ला होते. ते त्यांचे पिढीजात उदरनिर्वाहाचे साधन होते. मी नेहमी सांगतो की परमात्मा जेव्हा आपल्यावर कृपा करतो, तेव्हा परमेश्वर दरबारातच निर्णय घेतो की अमुक आत्म्याचा आपल्याशी मिलाप घडवून आणावयाचा आहे. एखाद्याच्या नशिबात सुख-दु:खांची नोंद करतानाच, याची सतगुरूंची भेट कधी होईल याबद्दलही नोंद करतो. तसेच यास नाम कधी मिळेल? याचा सतगुरूंवर विश्वास कधी ठाम होईल? हे सर्व नशिबामध्येच नोंदलेले असते. ज्यावेळी इतर सर्व आसऱ्यांचा आपण त्याग करतो, निराश्रित होऊन परमात्म्यास साद घालतो, तेव्हाच आपल्या अंत:करणामध्ये विरह निर्माण होतो, आपणांस आश्रय देऊ शकणाऱ्या परमात्म्यास आपण साद घालतो.

बुल्लेशाहाच्या अंत:करणामध्ये परमात्म्याप्रती विरह निर्माण झाल्यानंतर त्याने एका सत्संगीस भेटून विचारले,''प्रिय मित्रा, माझ्या अंत:करणातील परमात्मा मिलनाची तहान भागवू शकणाऱ्या कुणा सतगुरूंची मला माहिती

दे.'' त्या सत्संगीने त्यास ईनायत शाहा यांची माहिती सांगितली. ईनायत शाहा शेती करीत असत. त्यांचे विशेष शिक्षण झालेले नव्हते. प्रेमींना समजून सांगण्याची संतांची आप-आपली पद्धत असते. ईनायत शाहांनी बुल्लेशाहाला थोडक्यात समजावून सांगितले. त्यावेळी ईनायत शाहा शेती काम करत होते. शेतामधील कांद्यांची रोपटी एका वाफ्यातून काढून दुसऱ्या वाफ्यामध्ये लावत होते. बुल्लेशाहाने ईनायत शाहांना विचारले,''महाराज! मला परमात्मा प्राप्तीचा मार्ग सांगा.'' त्यावर ईनायत शाहा उत्तरले, ''मनास या जगातून दूर हटवून गुरू परमात्म्याशी जोड.''

बुल्लेया रब दा की पावंणा, एदरो पुट्टणा ते ओदर लावणा।

स्वामीजी महाराज सांगतात,''तुम्ही गुरूंवर खरेखुरे प्रेम करा, नामरूपी गुरूंचे ध्यान धरा. गुरूप्रेमात एकरंग व्हा. सचखंडवासी सतगुरूंवर तुम्ही जेवढे जास्त प्रेम कराल, तेवढी अधिक उन्नती तुम्ही अंतर्यात करू शकाल.'' कबीर साहेब सांगतात:

ब्रह्म बोले काया के ओले काया बिन ब्रह्म क्या बोले।

संतांचे शब्दरूप स्वरूपही असते, ज्यामध्ये ते सदैव राहतात. आपणांस समजावण्यासाठी म्हणून त्यांनी देह धारण केलेला असतो. महात्मा आपणांस सांगतात की परमात्मा जर देव-देवतांच्या रूपात आला असता, तर आपण त्यास पाहू शकतो नसतो. त्याने जर गाय-म्हशीच्या रूपात येऊन समजावले असते, तर आपण त्याची भाषा समजू शकलो नसतो. तो मनुष्यांमध्ये मनुष्य बनून येतो, कारण आपल्या सारख्यांशी आपले प्रेम जुळते.

आजपर्यंत जे कुणी ऋषी-मुनी, संत-सतगुरू, पीर-पैगंबर या जगामध्ये आले, ते सर्वजण मनुष्य शरीर धारण करूनच आले. जे आत्मे त्यांच्या सान्निध्यात आले व ज्यांनी महात्म्यांच्या सांगण्यानुसार नामाची कमाई केली, महात्म्यांनी त्यांस या भवसागरापार नेण्याची जवाबदारी घेतली व त्या आत्म्यांना ते सोबत घेऊन गेले. आज ते आत्मे या सुख-दु:खांच्या नगरात

पुन्हा परतले नाहीत. जर या दु:खी संसारात जन्म-मृत्युच्या चक्रनेमिक्रमात अडकून रहायचे असल्यास महात्म्यांच्या सान्निध्यात जाण्याचा काय उपयोग?

छुटेगा जन्म और मरना। अमर पद जाय तू पाई।।

शब्द-नामाची कमाई केल्याने तुमचा जन्म-मरणाचा फेरा सुटेल. तुम्हांस परमपद लाभेल, ज्याठिकाणी जन्म-मृत्यु नाही, केवळ शांतीच-शांती आहे.

भाग तेरा जगे सोता। नाम और धाम मिल जाई।

स्वामीजी महाराज सांगतात,''आपले सौभाग्य असेल, तर आपल्या अंतरात नाम प्राप्तीची इच्छा निर्माण होते व आपणांस नाम मिळते. नामदान प्राप्त करण्याचा हाच फायदा आहे की आपणांस ते धाम प्राप्त होते जेथून दुरावून आपला आत्मा या जगात आला आहे.''

कहूं क्या काल जग मारा। जीव सब घेर भरमाई।।

स्वामीची महाराज सांगत आहेत,''मी काय करू? काळाने सर्व जीवांना भ्रमात टाकले असून, ते भ्रमिष्टावस्थेतच आपले संपूर्ण जीवन व्यतीत करून जातात. तो भ्रम कोणता आहे? आपण जे काही आपल्या नेत्रांनी पाहत आहोत, त्यांपैकी काहीही मृत्युपश्चात आपल्यासोबत जाणार नाही. एवढेच नाही, तर आपण आपला देहदेखील येथेच सोडून जाणार आहोत.''

नहीं कोइ मौत से डरता। खौफ जम का नहीं लाई।।

आपण सांगत आहात,''आपण सांसारिक जीव काळाने पसरविलेल्या भ्रमाच्या जाळ्यात सापडल्याने आपणांस आपल्या मृत्युचाही विसर पडलेला आहे. यमाचे भयदेखील आपणांस वाटेनासे झाले आहे.''आपणांस वाटते की या जगात येऊन आपण कसेही वागलो तरी आपणांस कोण विचारणार आहे?

ऐह जग मिट्ठा अगला किन डिट्ठा।

पड़े सब मोह की फाँसी। लोभ ने मार धर खाई।।



स्वामीजी महाराज सांगत आहेत,''काळाने आपणा सर्वांवर मोहाचे जाळे टाकलेले आहे. त्यामुळे आपण माझी पत्नी, माझी मुले, मी श्रीमंत आहे असे म्हणतो परंतु प्रभु-परमात्म्यास मात्र आपण परके समजतो.''

चेत कहो होय अब कैसे। गुरू के संग नंहि धाई।।

अशा जन्मो-जन्मांतरांपासून निद्रावस्थेमध्ये असलेल्या जिवांना कशी बरे जाग येईल? ते जीव गुरूंच्या सोबत-संगतीत जाण्यासदेखील तयार नाहीत. ते म्हणतात की आमच्याकडे आता वेळ नाही. थोडाफार वेळ मिळाल्यास त्यांना निद्रा आणि विषय-विकार प्रिय आहेत.

काम और क्रोध बिच बिच में। जीव से भाड़ झोंकवाई।।

काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार या पाच शक्ती आहेत, त्यातील काम आणि क्रोध अतिशय बलवान आहेत. त्यांनी जिवांना आपल्या तावडीत जखडून ठेवले आहे. क्रोधामुळे लक्ष विखुरते, एकाग्र होत नाही. कामामुळे आत्मा नामाच्या लायक राहत नाही, तो नीच पातळीवर जातो.

कबीर साहेब सांगतात,''कामी, क्रोधी, लालची लोकं परमात्म्याची भक्ती करू शकत नाहीत. एखादा शुर-वीरच भक्ती करू शकतो.''

गुरू बिन कोई नहीं अपना। जाल यह कौन तुड़वाई।

स्वामीजी महाराज सांगतात, ''तूच सांग! मृत्युसमयी तुला तुझी धन-संपत्ती किंवा समाज मदत करू शकेल काय? त्यावेळी तुझी मदत केवळ तुला नाम देणारे सतगुरूच करू शकतात. परंतु त्यांच्यावर तुझे असलेले प्रेम नकली व दिखाव्याचेच आहे.'' संत स्वतःचे ओझे दुसऱ्या कुणावरही लादत नाहीत. ते सेवकांकडून एक पैशाचीही अपेक्षा ठेवत नाहीत. ते सेवकांकडून केवळ शब्द-नामाच्या कमाईचीच अपेक्षा करतात की तुम्ही ध्यान-अभ्यास करून आणा. तुमच्याकडून उपकाराचा मोबदला न मागणारा, तुमच्यावर ओझे न लादणारा सेवक तुम्हांस आवडत नाही का? सतगुरू खूप दयावंत असतात. त्यांनी आपणास नाम दिलेले असते. त्यामुळे आपल्या मृत्युसमयी त्यांच्या दयेचा सागर उफाळून येतो. त्या अवघड वेळी सतगुरू त्यांच्या सेवकाचा सांभाळ नक्कीच करतात.

महात्म्यांचा स्वानुभव आहे की जे लोक शांत राहून नामाची कमाई करतात, ते अतिशय शांतपणे शरीराचा त्याग करतात. सतगुरू त्यांना अगोदरच सांगतात की मी तुला कधी नेणार आहे? परंतु अशावेळी जर आपण सतगुरूंकडे लक्ष दिले नाही, तरीही सतगुरू आपला सांभाळ करतात. परंतु आपण त्यावेळी भयग्रस्त होऊन या जगातून निघून जातो.

कुटुम्ब परिवार मतलब का। बिना धन पास नंहि आई।

स्वामीजी महाराज सांगत आहेत, ''आपले कुटुंब व नातेवाईक सर्वजण स्वार्थी असतात. आपल्याकडे जर धन-संपत्ती आणि उच्चपदाची मान-प्रतिष्ठा असेल तर सर्वजण आपली खुशामत करतात. परंतु धन नसल्यास कुणीही आपली खुशालीदेखील विचारत नाही.''

***

रक्षक

परमसंत अजायब सिंहजी महाराजांनी
प्रेमींना दिलेला अनमोल संदेश

ज्याचा संरक्षक स्वत: परमात्मा आहे. त्यास या जगातील कोणतीही शक्ती मारू शकत नाही. या जगात ज्याचा परमात्म्यास विसर पडलेला आहे, परमात्म्याने ज्यास आपल्या भक्तीचे दान दिलेले नाही, आपले प्रेम दिलेले नाही तोच मनुष्य मृत पावलेला आहे.

एक गर्भार हरिणी शांतपणे झोपलेली होती. हे शिकाऱ्याच्या नजरेस पडता, त्याने तिला पकडण्यासाठी एका बाजूला जाळे पसरले तर दुसऱ्या

बाजूस आपला शिकारी कुत्रा उभा केला, तिसऱ्या बाजूस आग पेटविली आणि चौथ्या बाजूने तो स्वत: धनुष्य–बाण घेऊन उभा राहिला. अग्नीची उष्णता जाणवल्याने हरिणीला जाग आली. तिने पाहिले की तिला पकडण्यासाठी एका बाजूला जाळे, दुसऱ्या बाजूला शिकारी कुत्रा, तिसऱ्या बाजूस आग तर चौथ्या बाजूस स्वत: शिकारी धनुष्य–बाण घेऊन उभा आहे.

तिने परमात्म्यापुढे विनवणी केली, ''एक तर मला प्रसुतिवेदना होत आहेत आणि त्यावर हे आणखीन एक संकट उभे राहिले आहे.'' पशु–पक्षी देखील आपल्या भाषेत परमात्म्याची प्रार्थना करीत असतात. आपणांस कल्पना आहे संकट समयी आपले लक्ष आपोआपच परमात्म्याकडे वळते. त्यावेळी परमात्म्याची तिने विनवणी केली असता, तिच्या मदतीसाठी परमात्म्याने एक मोठे वादळ पाठविले. वादळाने अग्नी उडून जाळ्यावर पडल्याने ते जाळे जळून गेले. तो शिकारी बाण मारण्यासाठी सरसावला असता त्याच्या पायाखालील जमिनीतून साप बाहेर पडला व त्याने शिकाऱ्यांस दंश केला. त्यामुळे शिकाऱ्याचा नेम चुकला व त्याने मारलेला बाण त्याच्या कुत्र्यास लागला. अशा तऱ्हेने त्या हरिणीची सुटका झाली. शिकाऱ्याची तिला पकडण्याची योजना फिसकटली. जाळे जळाले, कुत्रा मेला आणि शिकाऱ्यास सापाने दंश केला.

ही गोष्ट सांगण्यामागे माझा हा हेतु आहे की ज्याचा संरक्षक परमात्मा आहे, त्यास कुणीही मारू शकत नाही. जो कुणी परमात्म्याची प्रार्थना करतो, त्याच्या संरक्षणासाठी परमात्मा धावून येतो.

परमात्मा सर्वांचा संरक्षक असून तो सर्वांवर दया करीत असतो. परंतु दुर्दैव! आपण परमात्म्यास सोडून इतर कुणाची तरी आराधना करतो, कुणा इतरांकडून मदत मागतो. परमात्म्यास सोडून इतर कुणीही पूजा करण्यालायक व आपली मदत करण्यालायक नाही.

***

अमृतवेळ

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे ध्यान-अभ्यासात बसविण्यापूर्वी प्रेमींना दिलेला संदेश, मुंबई, महाराष्ट्र - १२ जानेवारी, १९८७

होय बंधुंनो! आपणांस जाणीव आहे की आपण कोणत्या उद्देशाने येथे एकत्रित झालो आहोत. महाराज सावन सिंहजी पहाटेच्या प्रहरास अत्युत्तम वेळ असे संबोधत असत कारण आपण त्यावेळी निद्रेतून नुकतेच उठलेलो असतो. त्यावेळी सर्व सांसारिक विचार आपण विसरलेलो असतो. शरीर ताजेतवाने असते व आत्म्याने त्यामध्ये नव्याने प्रवेश केलेला असतो. या संधीचा आपण पुरेपूर फायदा करून घ्यावयास हवा.

मी ध्यानात बसविण्यापूर्वी संगतला दोन–तीन गोष्टी नेहमी सांगत असतो की तुम्ही मनास शांत करा, कारण शांत मनच ध्यान–अभ्यास करू शकते. मन अशांत असण्याचा अर्थ असा की आपल्या अंतरात निरनिराळे सांसारिक संकल्प–विकल्प निर्माण होत असतात, कधी कसला विचार येतो तर कधी कसला विचार येतो. जर तुम्ही मनास बजावून ध्यान–अभ्यासासाठी बसलात व सांसारिक गोष्टींविषयी विचार केला नाही, तर मन शांत राहील.

अभ्यासास कधीही आपल्यावर लादलेले ओझे असे समजू नये तो प्रेमाने करावा. आपण जर एखाद्या प्रापंचिक मनुष्याचे काम तन्मयतेने केले तर तो आपल्यावर खूष होतो. त्याचप्रमाणे गुरू–परमात्म्याने सांगितलेले काम आपण प्रेमाने केल्यास आपण गुरू–परमात्म्याची खूषी प्राप्त करू शकतो.

शहरांमध्ये आपणांस खूप चांगले ज्ञान मिळते की प्रत्येकजण आपली कार विचलीत न होता पळवत असतो. तो आजूबाजूस लक्ष देत नाही, कारण त्याचे लक्ष त्याच्या इष्टस्थळी पोहचण्याचे असते. त्यास कल्पना असते की इतरत्र लक्ष देत राहिल्यास आपला वेळ वाया जाईल, माझ्या इष्टस्थळी पोहचणे अत्यावश्यक आहे. आपणही कोणत्याही प्रकारच्या बाह्य आवाजाकडे लक्ष देऊ नये. आपल्या सतगुरूंनी जे काही आपणांस आपले मुक्कामी इष्टस्थळ सांगितले आहे, त्या ठिकाणावर आपले लक्ष केंद्रीत करावे, जेणेकरून आपला वेळ वाया न जाता आपण लवकरात लवकर त्या ठिकाणी पोहचू शकू. ध्यान–अभ्यास करून अंतर्यात जाण्याचा तिसऱ्या तिळाशी खूप निकटचा संबंध आहे. गुरू नानकदेवजी सांगतात:

जे को पावे तिल का मान।

आपणांस आपले लक्ष तिसऱ्या तिळावर केंद्रीत करणे गरजेचे आहे, कारण आपल्या घरी जाण्याचा दरवाजा तिसरा तिळच आहे. तिसरा तिळ आपल्या दोन्ही भुवयांच्या मधोमध असलेली जागा आहे, जेथे बायका वा पुजारी लोकं टिळा लावतात. त्या ठिकाणावर आपण एकाग्र व्हायचे असून, इतरत्र भरकटू नये.

क्राईस्टने सांगितले होते, ''आपल्या वडिलांच्या घरामध्ये अनके खोल्या आहेत. आपल्या वडिलांनी आपणांस घराबाहेर काढलेले आहे. आपण जर प्रेमाने दरवाजा ठोठावला, तर ते आतून दरवाजा उघडतील.'' संत आपणांस नाम देतात व आपले लक्ष तिसऱ्या तिळावर एकाग्र करण्यासाठी सांगतात. नामस्मरण करून एकप्रकारे आपण परमात्म्याचा दरवाजा ठोठावत असतो.

परमात्मारूप गुरू आपणांस नाम देते वेळी आपल्या अंतर्यात बसतात. ज्यावेळी ते पाहतात की आपण त्यांच्यासाठीच दरवाजा ठोठावत आहोत, ते तत्काळ दरवाजा उघडून आपणांस त्यांच्या मिठीत घेतात. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात,''परमात्म्याचे हे वैशिष्ट्य आहे की त्याने जर एखाद्यास एकदा का आपल्या मोठीत घेतले, तर पुन्हा त्यास दुरावत नाही.''

ज्या वस्तूच्या शोधासाठी परमात्म्याने आपणांस हा मनुष्यजन्म दिला आहे, ती वस्तू आपल्या अंतर्यातच मिळते. त्या वस्तूंच्या प्राप्तीसाठी आपणांस बाह्य जगातील कोणत्याही प्रकारचे रिती-रिवाज वा कर्मकांड करण्याची गरज नाही. आपण आपले लक्ष बाह्य जगातून दूर सारून, तिसऱ्या तिळावर एकाग्र करा. ती वस्तू आपल्या अंतर्यातच आहे. होय बंधुंनो, आता ध्यान-अभ्यासासाठी बसा.

***

धन्य अजायब

परम संत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणीतील
संत-बानी आश्रमातील सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती



सन्तबानी आश्रम १६ पी एस राजस्थान येथील कार्यक्रम

०३ मार्च ते ०५ मार्च २०१७

३१ मार्च ते ०२ एप्रिल २०१७